निवेदन (प्रेसनोट)

अल निनोच्या प्रभावामुळे या वर्षी पर्जन्यमानात घट झाल्याने तसेच अल निनोचा प्रभाव पुढील वर्षी पर्यत राहणार असल्याने राज्यातील उपलब्ध जलसाठ्याचे काटकसरीने व अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने व्यवस्थापन करणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर दि. ३१ ऑगस्ट २०२७ पर्यंत पिण्याच्या पाण्याची गरज सुरक्षित ठेवण्याच्या दृष्टीने राज्यातील उपलब्ध जलसाठ्याचे धरणनिहाय व वापरनिहाय सूक्ष्म नियोजन करणे, विविध पाणी वापरांसाठी स्पष्ट प्राधान्यक्रम निश्चित करणे आणि संभाव्य दुष्काळ सदृश परिस्थितीचा प्रभाव कमी करण्यासाठी पूर्वतयारीच्या उपाययोजना करणेसाठी महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभागामार्फत महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण २०२६/(प्र.क्र.५०/२०२६)/सस.व्य.(धो.), दि. ०५/१०/२०२६.अन्वये शासन निर्णय निर्गमित केला आहे. सदर शासन निर्णयामध्ये सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांनी दि. १६ ऑक्टोबर २०२६ पासून पाणी वापरामध्ये किमान १० टक्के कपात करावी. तसेच उपलब्ध पाण्याचा दि. ३१ ऑगस्ट २०२७ पर्यंत पुरवठा होणेच्या अनुषंगाने आवश्यकतेनुसार कपात वाढवावी. पिण्याच्या पाण्याचा अनावश्यक वापर टाळण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांनी नागरिकांमध्ये पाणी बचतीबाबत व्यापक जनजागृती करावी असे आदेश देण्यात आलेले आहेत

खडकवासला धरण साखळीमध्ये दि.१२/१०/२०२६ अखेर २६.२२ टीएमसी पाणीसाठा शिल्लक आहे. हा पाणीसाठा दरवर्षीच्या उपलब्ध पाणीसाठ्याच्या तुलनेत कमी आहे. या पार्श्वभूमीवर पुणे शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला धरण साखळी, भामा आसखेड धरण व पवना धरणातील उपलब्ध जलसाठा, पाटबंधारे विभागाकडून प्राप्त सूचना तसेच आगामी कालावधीतील पिण्याच्या पाण्याची उपलब्धता याबाबत महापालिकेमार्फत आढावा घेण्यात आला आहे.

सद्यस्थितीत शहरासाठी दरवर्षीच्या तुलनेत कमी पाणीसाठा उपलब्ध असून संभाव्य कमी पर्जन्यमानाचा विचार करून जलस्रोतांचे नियोजनबद्ध व्यवस्थापन करण्याचा शासनामार्फत निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार पुणे महानगरपालिका हद्दीमध्ये दिनांक १५/१०/२०२६ पासून दर गुरुवारी (प्रत्येक आठवड्याच्या गुरुवारी) संपूर्ण शहराचा पाणीपुरवठा बंद ठेवण्यात येणार आहे. या उपाययोजनेमुळे उपलब्ध जलसाठ्याचा कार्यक्षम वापर होऊन आगामी काळात शहरातील सर्व नागरिकांना पिण्याच्या पाण्याचा पुरेसा पुरवठा करण्यास मदत होणार आहे.

या पार्श्वभूमीवर पुणे महानगरपालिकेच्या वतीने नागरिकांसाठी पुढीलप्रमाणे आदेश आवाहन करण्यात येत आहे.पाण्याचा काटकसरीने वापर करून प्रयत्नांना सहकार्य करावे, नागरिकांनी पुढील बाबींचे पालन करावे :

- कोणत्याही बांधकामासाठी पिण्याचे पाणी वापरण्यात येऊ नये. त्याकरिता एसटीपीचे पाणी अथवा बोअरवेलचे/विहिरीचे पाणी वापरण्यात यावे.
- घरातील सर्व नळ तसेच, सार्वजनिक स्वच्छतागृहे येथील नळ कनेक्शन, फ्लश टाक्या व पाईपलाईनमधील गळती तात्काळ तपासून ती दुरुस्त करावी. शासकीय तसेच पुणे मनपाच्या मालकीच्या सर्व इमारतीमधील नळजोड/वॉशरूम /फ्लश टॅक तपासून गळती बंद करावी.
- सार्वजनिक तसेच, खाजगी वॉशिंग सेन्टर्स बंद करणेत यावेत. वाहन धुणे, अंगण किंवा पदपथ स्वच्छ करणे यासाठी बोरिंग अथवा पुणे महानगरपालिकेच्या पाण्याचा वापर करू नये.
- खाजगी आणि सार्वजनिक स्विमिंग पूल तसेच खाजगी/मनपाच्या उद्यानांकरिता पिण्याच्या पाण्याचा वापर बंद करण्यात यावा.
- ज्या खाजगी सोसायट्याना एसटीपी बांधण्यात आला आहे त्या एसटीपी कार्यान्वित ठेवणे बंधनकारक आहे. तसेच, बंद एसटीपी सुरु करून त्या पाण्याचा पुनर्वापर गार्डनिंग व फ्लशिंगकरिता करणेत यावा.

- आंघोळ, भांडी धुणे व कपडे धुणे यासाठी आवश्यक तेवढ्याच पाण्याचा वापर करावा. पाण्याचा अपव्यव टाळावा.
- सार्वजनिक हॉटेल्स तसेच रेस्टोरेंट, खाजगी/कॉलेजचे होस्टेल इमारती यांच्या व्यवस्थापकांनी पिण्याच्या पाण्याची सर्व प्रकारे बचत करून सहकार्य करावे.
- पाण्याच्या टाक्या ओव्हरफ्लो होणार नाहीत याची दक्षता घ्यावी व आवश्यक असल्यास ऑटोमॅटिक फ्लोट व्हॉल्व्हचा वापर करावा.
- घरगुती वापरातून निर्माण होणारे तुलनेने स्वच्छ पाणी (Grey Water) बागकाम किंवा स्वच्छतेसाठी पुनर्वापर करण्यास प्राधान्य द्यावे.
- सार्वजनिक ठिकाणी पाणीगळती, फुटलेल्या जलवाहिन्या किंवा पाण्याचा अपव्यय आढळल्यास तत्काळ पुणे महानगरपालिकेस कळवावे.
- पाणी साठवताना आवश्यक तेवढेच पाणी साठवावे व अनावश्यक साठवणूक टाळावी.
- गृहनिर्माण संस्था, व्यापारी आस्थापना यांनी पाणी बचतीसाठी विशेष उपाययोजना राबवून महानगरपालिकेस सहकार्य करावे.
- अनधिकृत नळजोड आढळून आल्यास अगर तशी तक्रार प्राप्त झाल्यास सदर अनधिकृत नळजोडावर कारवाई करण्यात येईल. तसेच, संबंधित नागरिकांवर गुन्हे दाखल करण्यात येतील, याची नोंद घेण्यात यावी.
- जलतरण तलावाकरिता पिण्याच्या पाण्याचा वापर करण्यात येऊ नये.

पाणीकपाती कालावधी मध्ये पाणीपुरवठा विषयक तक्रार असल्यास Call Center/ Pmc Care 1800-1030-222, WhatsApp 9689900002/Pmc Care App यावर तक्रार करावी. यामध्ये तातडीच्या कामासाठी काही बदल झाल्यास त्याची माहिती पुणे महानगरपालिकेच्या https://www.pmc.gov.in/ या संकेत स्थळावर देण्यात येईल.

पवनीत कौर (भा. प्र. से)
अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)
पुणे महानगरपालिका